दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२६० | शुक्रवार,दि.२३ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-260 | Friday, Dt.23 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पूर्व राज्यातील गृह विभागात केला मोठा बदल ?


## महाराष्ट्रातील तब्बल २१ पोलीस अधीक्षकांच्या तडकाफडकी बदल्या !

बीड / वैभव स्वामी

लवकरच महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे.त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे चाणाक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह विभागामध्ये मोठा फेरफार करत तब्बल २१ जिल्ह्यातील पोलीस अधीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. गृह विभागानंतर इतर विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा देखील धुमधडाका लवकरच वाजणार आहे.

प्राप्त माहितीनुसार,महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मधील तरतुदींनुसार, महाराष्ट्रातील भा.पो.से. अधिकारी यांची नमूद पदावरुन निर्दिष्ट पदावर, याद्वारे, प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात येत असल्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. प्रशासकीय कारणास्तव बदलीला पात्र ठरलेले अधिकारी याप्रमाणे,भा.पो.से. अधिकारी १. राकेश ओला, २. सोमनाथ घार्गे,३. आंचल दलाल, ४.महेंद्र पंडीत ५. योगेश कुमार गुप्ता, ६. बच्चन सिंह, ७.अचित चांडक, ८. मंगेश शिंदे, ९. राजतिलक रोशन, १०. बाळासाहेब पाटील ,११. यतिश देशमुख, १२. सौरभ अगरवाल, १३. मोहन दहिकर, १४. विश्व पानसरे, १५. निलेश तांबे,१६. समीर अस्लम शेख, १७. तुषार दोषी,१८. सोमय विनायक मुंडे, १९. जयंत मीना, २०. नितिन बगाटे, २१. रितु खोकर या २१ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश आस्थापना मंडळ क्र. १ च्या शिफारशींचा यथायोग्य विचार करुन, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,(व्यंकटेश भट) शासनाचे सह सचिव यांनी सदरील बदलांचे आदेश पारित केले आहेत.







# पांगरबावडीतील दोन बालविवाह रोखले नवदांपत्य नवरा बायको चौघेही अल्पवयीन !

बीड ।राजयोग प्रतिनिधी

गुरुवार दिनांक २२.५ .२०२५ रोजी, पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीत पांगरबावडी या गावी सखाराम मोगलाजी संकोड, व गंगाराम गंगाधर अनारसे यांचे घरी एकत्र दोन बालविवाह होत असल्याचे गोपनीय माहिती -ढक्ण पथकास मिळाली होती,त्या नुसार -क्ढण पथकाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व पांगरबावडी गावाचे बालविवाह अधिकारी यांनी भेट दिली असता लग्नातील दोन्ही नवरी मुली अल्पवयीन मिळून आल्या. या पथकाने त्यांची आणि त्यांच्या पालकांची समजूत काढत हे बालविवाह रोखले.



शिक्षणाचा अभाव, भटके जीवन, तसेच कायद्याबद्दलचे अज्ञान, तरुण मुलींना वयात आल्यानंतर सांभाळायचे कसे ? अशी अनेक कारणांमुळे अल्पवयीन मुलीचा विवाह लावत असल्याचे पालकांनी सांगितले. दोन्ही कडील आई वडील नातेवाईक, यांना -क्ढण पथकाने कमी वयातील लग्नामुळे मुलींच्या शरीरावर होणारे गंभीर परिणाम, लहान वयात पडणाऱ्या जबाबदाऱ्या, कुपोषित अपत्य, शिक्षणाचे महत्त्व अशा सर्व समुपदेशन करून मुलीचा विवाह अठरा वर्षे झाल्याशिवाय लावून देणार नाही, असे हमीपत्र घेवून सदरचे दोन्ही बालविवाह रोखण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली -क्ढण अवैध मानवी वाहतूक कक्षाच्या प्रमुख सहा.पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, मनीषा खरमाटे, रूपाली टोणे,यांचेसह बालविवाह अधिकारी ग्रामसेवक एस. बी. सपकाळ, व सामाजिक कार्यकर्ते तथा अधीकार मित्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीडचे तत्त्वशील कांबळे यांनी केली.

### दोन्ही नवरा नवरी अल्पवयीन

दोन्ही नवरी मुलीचे वय १६ वर्ष तर दोन्ही मुलांचे वय १९ वर्ष असे असल्याने दोघांचेही वय विवाहासाठी अयोग्य आहे. तसेच हा कायद्याने बालविवाह असून आपण त्या नंतर ही जर बालविवाह केला तर नवरा नवरींसह नवरा नवरीचे आई-वडील व नातेवाईक यांच्यावर कायद्यानुसार गुन्हा दाखल होऊ शकतो या संदर्भात योग्य ते समुपदेशन केल्यानंतर सदरील दोन्ही बालविवाह थांबवण्यात आले.

# भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशनच्या मदतीमुळे कामाला बळकटी मिळाली - आ.संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

सध्या आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून व नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता व खोलीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनी स्वेच्छेने आपले योगदान देत या महत्त्वाच्या कामात हातभार लावला आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मागील ३ दिवसांपासून बीड शहारातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोलीकरणाचे काम आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि

(उर्वरीत पान २ वर)



बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरणाच्या कामातील योगदानाबद्दल आ.क्षीरसागरांकडून आभार व्यक्त

# कॅप्टन नवनीत कॉवत यांनी आपली अरव्वी टीमच बदलली !

## बीड जिल्हा पोलीस दलाच्या इतिहासात पहिल्यांदाच सौदेबाजी न होता एका स्ट्रोक मध्ये डबल सिक्सर लावत ६०६ पोलीस अंमलदारांच्या बदल्या !!



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाढलेले अवैध धंदे, वाढलेली गुंडगिरी, वाढलेली दादागिरी, पोलीस प्रशासनामध्ये वाढलेला राजकीय हस्तक्षेप लक्षात घेता पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी वर्षानुवर्ष एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या शेकडो पोलिसांच्या बदल्या एका स्ट्रोक मध्ये केल्या आहेत. विशेष बाब म्हणजे बीड जिल्हा पोलीस दलाच्या इतिहासात पहिल्यांदाच कसलीही सौदेबाजी न होता तब्बल ६०६ पोलीस अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या बदल्या करताना संबंधित पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांचे समुपदेशन घेऊन स्वतः पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी त्यांच्या वैद्यकीय, शैक्षणिक, कौटुंबिक गरजा लक्षात घेऊन यातील ज्यांना खरीच अडचण आहे अशा १५ पोलिस अमलदारांच्या बदल्यांना एक वर्षाची मुदतवाढ देत उर्वरित ६०६ पोलीस अंमलदारांच्या बदल्यांचे आदेश पारित केले आहेत. इतका धाडसी निर्णय घेणारा पहिला पोलीस अधीक्षक बीड जिल्ह्याला लाभला असल्याची चर्चा आता सर्वत्र होत आहे.


बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कामत यांनी पदभार घेतल्यापासून बीड जिल्ह्यातील गुंडगिरीला पोलिसी खाक्याचा वचक काय असतो हे दाखवून दिले आहे. मात्र बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अंतर्गत काम करताना त्यांच्या लक्षात आले की, बीड जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांतर्गत असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी हे कोणाच्या ना कोणाच्या आशीर्वादाने वर्षानुवर्ष एकाच जागेवर आहेत.त्यामुळे अवैध व्यवसायिकांची त्यांचे हितसंबंध जुळले गेले आहेत. त्यामुळे आरोपींना अभय आणि निर्दोष यांच्यावर अन्याय काही प्रमाणात बीड जिल्ह्यामध्ये वाढला आहे. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या पोलीस कर्मचारी, अधिकारी यांच्या कामकाजाचा, त्यांच्या नियुक्ती पासून आतापर्यंत किती वर्षापासून एकाच ठाण्यामध्ये किंवा तालुक्यामध्ये किंवा जिल्ह्यामध्ये कार्यरत असल्याचा आढावा घेतला. त्यानुसार त्यांनी १५ व १६ मे रोजी बदल्या संदर्भात समुपदेशन घेऊन त्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या देखील सहानुभूतीने समजून घेतल्या, ऐकून घेतल्या. यामध्ये ज्या पोलीस कर्मचाऱ्यांची खऱ्या अर्थाने वैद्यकीय, शैक्षणिक, कौटुंबिक अडचण आहे अशा वास्तव १५ पोलीस अंमलदारांना बदली पात्र न ठेवता त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देत पोलीस खात्यातील माणुसकीचे उत्कृष्ट दर्शन देखील पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी आपल्या या कृतीतून दाखवून दिले. त्यांनी पाच वर्ष एकाच ठाण्यांतर्गत सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना बदलीला पात्र ठरवले.एकाच तालुक्यामध्ये बारा वर्षे पूर्ण झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना देखील बदलीला पात्र ठरवले. एवढेच नव्हे जे पोलीस कर्मचारी आपल्या मूळ गाव असलेल्या तालुक्यात कार्यरत आहेत कार्यरत आहेत अशाना ही बदलीला पात्र ठरवले. पाच वर्ष पूर्ण झालेले २२९ पोलीस कर्मचारी तसेच एकाच तालुक्यामध्ये १२ वर्षे पूर्ण झालेले २१६ पोलीस कर्मचारी, स्वतःच्या तालुक्यांमध्ये कार्यरत असलेले १६१ पोलीस कर्मचारी बदली पात्र ठरवले. प्रशासकीय कारणास्तव बदलीला पात्र ठरलेले ४९ पोलीस कर्मचारी, वैद्यकीय कारणास्तव बदलीला पात्र असलेले १३ पोलीस कर्मचारी, खेळाडू असलेले ४ पोलीस कर्मचारी आणि तांत्रिक तज्ञ असलेले ४ पोलीस कर्मचारी बदली पात्र ठरल्याने त्यांच्या बदल्यांचे आदेश पारित केले आहेत. तब्बल ६०६ पोलीस अंमलदारांच्या बदल्या करत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बदल्यांचा डबल सिक्सर ठोकत धमाल उडून दिली आहे.

पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या प्रेस नोट नुसार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ व त्यामधील (सुधारणा) २०१५ अन्वये तसेच शासन निर्णय दिनांक टीआरएन-११०/प्र.क्र. ४८८/पोल ५ब मुंबई दिनांक २३/०४/२०१० मधील तरतुदीनुसार बीड पोलीस दलातील सन २०२५ मध्ये सर्वसाधारण बदल्या च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आस्थापना मंडळ गठीत करण्यांत आलेले आहे. सदरचे आस्थापना मंडळाची दिनांक २७/०३/२०२५ रोजी वार्षीक बदलीपूर्व आढावा बैठक आयोजित करण्यांत आलेली होती. सदरचे बैठकीमध्ये शासन निर्णयातील सर्व तरतुदीचे बारकाईने अवलोकन होवून वार्षीक सर्वसाधारण बदली प्रक्रिया करीत बदलीपात्र पोलीस अंमलदार यांचे साठी खालील प्रमाणे निकष निश्चीत करण्यांत आलेले होते.

१) सध्याचे नेमणुकीचे ठिकाणी दिनांक ३१/

(उर्वरीत पान २ वर)

# सोलार प्लांटचे वादळी वाऱ्याने मोठे नुकसान !



जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील हिवरा बळी येथील शेतकरी. शेषराव संपत खरात यांच्या शेतातील मौजे हारपळा शिवारात गट नंबर १२ मध्ये ५ क्ष सोलार प्लांट बसवले होता. वादळी वाऱ्याने उडाल्याने नुकसान झाले. शेषराव खरात यांची हारपळा शिवारातील गट क्रमांक १२ मध्ये शेतजमीन असून त्यांनी शेतात सौर उर्जेवर चालणारा पंप बसविण्यात आला आहे .१८ मे रोजी हारपळा परिसरात वादळी वारा झाल्याने सोलार उडून गेली, पुर्णपणे क्षती ग्रस्त झाले, यात शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. सोलार बंद पडल्याने

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



## संपादकीय

### धोरण पाहावं आखून...

येत्या पाच वर्षांत आर्थिक दुर्बल, अल्प उत्पन्न आणि मध्यम उत्पन्न अशा गटांतील नागरिकांसाठी ३५ लाख घरे उपलब्ध करून देण्याचे राज्य सरकारचे नवे गृहनिर्माण धोरण महत्त्वाकांक्षी म्हणावे लागेल. राजकीय अस्थिरता, नोकरशाहीकडून झालेला विलंब आणि आर्थिक नियोजनासारख्या तांत्रिक अडचणी यांमुळे गेली काही वर्षे रखडलेल्या या धोरणास अखेर मुहूर्त लागला आहे. देशात सर्वाधिक वेगाने वाढत असलेल्या महाराष्ट्रातील परिस्थितीचा विचार करून आणि आव्हानांचा वेध घेऊन या धोरणात सर्वंकष तरतुदी करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी तरी दिसते.

माझे घर, माझा अधिकार असे घोषवाक्य असलेल्या या धोरणात शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणास अनुकूल अशी घरे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्याचा संकल्प सरकारने सोडला आहे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, महारेरा अशा विविध संबंधित यंत्रणांशीही विचारविनिमय करण्यात आला असून, गृहनिर्मिती क्षेत्रापुढील आव्हानांचाही उल्लेख करण्यात आला आहे. सोबत प्रत्येक जिल्ह्यातील निवासी सदनिकांची गरज आणि मागणी यांची येत्या वर्षभरात पाहणी करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहेत, ही या धोरणातील व्यावहारिक बाब म्हणावी लागेल.

सरकारनेच म्हटल्याप्रमाणे एकट्या मुंबईत ५२ टक्के नागरिक झोपड्यांमध्ये राहतात; तर देशातील एकूण झोपडपट्टीवासीयांपैकी १८ टक्के महाराष्ट्रात आहेत, हे राज्याच्या अनिर्बंध आणि अनियोजित नागरीकरणाचे भीषण वास्तव आहे. त्यांच्यासह विविध कारणांमुळे घरे नसलेल्या लाखो कुटुंबांना घर उपलब्ध करून देणे, हे जटिल आव्हान आहे. ते पेलण्यासाठी गृहनिर्मिती या विषयाचा स्वतंत्र विचार करता येणार नाही, तर भौगोलिक घटक, प्रत्येक गावातील आणि शहरातील स्थानिक परिस्थिती, आर्थिक मुद्दे, तसेच सामाजिक परिस्थिती, विकासाचे कायदे आणि वाहतूक यांसारख्या अनेक मुद्द्यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. त्या पार्श्वभूमीवर या धोरणात अनेक अंगांना स्पर्श करण्यात आला आहे.

लोकसंख्यावाढ, शिक्षण व रोजगारनिर्मितीची केंद्रे असलेल्या शहरांच्या परिसरातील वाढती लोकसंख्या, झोपडपट्ट्या, जमिनींचे गगनाला भिडलेले दर, परवडणाऱ्या घरांची टंचाई, भूसंपादनातील अडचणी, बांधकाम खर्चातील वाढ, तसेच रस्ते-पाणीपुरवठ्यासारख्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि आर्थिक अडचणी, अशी आव्हाने समोर असल्याचे सरकारने धोरणात नमूद केले आहे. त्यावर परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक ठिकाणच्या सरकारी व बांधकामयोग्य जमिनींची 'लँड बँक' करणे, चटईक्षेत्र निर्देशांक-विकास हस्तांतर हक्कांसारख्या सवलती, मोठ्या भूखंडांवर बांधकाम परवानगी देताना परवडणारी घरे बांधण्याची (समावेशक घरांची) सध्या फक्त नऊ महापालिकांमध्ये लागू असलेली अट सगळीकडे लागू करण्यासारख्या तरतुदींचा समावेश आहे.

# सर्दी तर होणारच ना...!

**पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो.**

**पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो.**

**साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम.**

विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये.आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम.आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण ७० टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे.

पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे.

पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल.

पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे.



आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

**-प्रशांत विजया अनंत दैठणकर**
(जिल्हा माहिती अधिकारी)बीड
चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

## अवकाळी पावसाने झालेल्या शेत पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यात काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी.

मंत्री श्री. जाधव - पाटील म्हणाले, अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३- २०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी ) रूपये तर २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी ( सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

# आर्ट ऑफ फन डान्स ॲण्ड ॲक्टींग शिबीर उत्साहात संपन्न

### आर्ट ऑफ फनच्या बालकलावंताना सिनेमात काम करण्याची संधी देवु - अभिनेते सुधीर निकम




राज्य स्तरावर शैकडो पारितोषिक आर्ट ऑफ फन अकॅडमीने पटकावली - दिपाताई क्षिरसागर

गेवराई (प्रतीनिधी)

शहरातील नामांकित आर्ट ाफ फन अकॅडमी च्या वतीने डान्स ण्ड क्टींग शिबिराचे आयोजन १० मे ते २० मे २०२५ या दरम्यान करण्यात आले होते. दहा दिवसीय शिबीरात सिने अभिनेते, दिग्दर्शक गणेश देशमुख, रवि धुताळमल, अशोक कानगुडे, नृत्यांगना वैभवी टाकणखार यांनी बालकलाकारांना शिबिरात प्रशिक्षण दिले. दि २० मे मंगळवार रोजी बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्षा सौ डॉ.दीपाताई क्षीरसागर, दिग्दर्शक अभिनेते डॉ.सुधिर निकम,नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील,पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर,शाहिर विलास सोनवणे,पत्रकार ड.शेख हारुन, युवा उद्योजक पांडुरंग मोहिते,यांच्या उपस्थितीत आर्ट ऑफ फन डान्स ण्ड क्टींग शिबर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या बालकलाकार आतिशिय जिद्द आणि चिकाटीने नाटकात सहभागी होवुन उत्कृष्ट अभिनय सादर करत आहेत त्यामुळे या अकॅडमिच्या बालकलाकारांना सिनेमा मध्ये काम करण्याची संधी देवु असे अभिनेते सुधीर निकम म्हणाले.

बीड जिल्ह्यात गेवराई ने ११४ वर्षाची नाटकाची परंपरा कायम ठेवली आहे आणि राज्य स्तरावर नाटकात सहभाग नोंदवुन आर्ट फन अकॅडमी च्या बालकलाकारांनी शैकडो पारितोषिक मिळवले आहे. आर्ट ऑफ फन अकॅडमिचे संचालक दिपक गिरी,शिवकुमार,रोहित पुराणिक,विवेक शर्मा यांनी बाल कलाकारांना स्टेज निर्माण करुन देण्यासाठी पुढाकार घेऊन अधिक मेहनत घेतली आहे असे बालरंभुमि राज्य उपाध्यक्ष दिपाताई क्षिरसागर म्हणाले. आर्ट ऑफ फन डान्स ण्ड क्टींग शिबीरात सहभागी बालकलाकारांना साप्ताहिक गेवराई आदर्श यांच्या सौजन्याने प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले

यावेळी गेवराई येथील जेष्ठ कलावंत प्रशांत रुईकर , मुकुंद टाक,सिने नाट्य कलावंत संतोषकजबे, उमेश मानधने व परीवार, पत्रकार लक्ष्मण ऊमाप, रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळाचे सदस्य,शिबिरात सहभागी सर्व विद्यार्थी, पालक व आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाने बीडसह ४ जिल्ह्यातील २३३ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे प्रवेश रोखले

### पण दरवर्षी तोच घाणा आणि तेच आदेश - ॲड. अजित देशमुख

बीड ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२५/ २०२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यातील दोनशे तेहतीस महाविद्यालयांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश पूर्णपणे रोखण्याचे आदेश दिले आहेत. दरवर्षी विद्यापीठाचा तोच घाना असतो. यातून काही करोडोची कमाई होत असल्याची चर्चा शैक्षणिक क्षेत्रामध्ये ऐकायला मिळते, असा आरोप ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख यांनी केला आहे.

विद्यापीठाच्या उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) यांनी दिनांक १७/०५/२०२५ रोजी मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता स्थगित करण्याबाबतचे आदेश जाहीर केले आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षमतेचा अभ्यास केला असता दरवर्षी हे आदेश काढले जातात. काही महिन्यात हे आदेश गुंडाळून ठेवले जातात. त्यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेची वाट लागली आहे. त्याला दस्तुर खुद्द विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप देखील देशमुख यांनी केला आहे.

नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र चांगल्या सुविधा दिल्या जात नाहीत. याची तपासणी विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळ समोर होते. या तपासणीतून महाविद्यालयांची नावे काढली जातात. त्यांची प्रवेश क्षमता शून्य करण्यात येते. मात्र दरवर्षी तोच घाणा घालून विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता ढासळवत आहे.विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील ६४ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यातील ५१ इतके महाविद्यालयांची तर धाराशिव येथील ३१ इतक्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तब्बल २३३ महाविद्यालय नियमाचे उल्लंघन करून महाविद्यालय चालवीत असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा उघडकीस आली आहे.महाविद्यालय चालवणाऱ्या संस्थाचालकांना त्याचबरोबर तेथील प्राचार्य, प्राध्यापक यांना आणि विद्यापीठाच्या कुलगुरू पासून ते वेगवेगळ्या विभागाचे उपकुलसचिवांपर्यंत एक साखळी निर्माण झाली आहे. ही साखळी विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा पुरवीत नाही.

## टि सी हरवला आहे..

धारूर तेलगाव प्रवासात विकास असांबर तोंडे रा सोनिमोहा ता. धारूर जि.बीड यांचा इयत्ता दहावीचा टी सी., मार्कमेमो हरवला आहे. सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क करा..मो ८७८८५४३६३६

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४२**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- २९/०१/२०२५**

अर्जदार श्री./ :- हमद सबीत बदाम प्रकरण :- सर्व्हे नं.४३४ सहान प्लॉट नं.१४ न.प.मि.नं.१८-१५२-१४ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( --------- ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नंबर १५ ते १८
पश्चिम :- मार्डी रोड
दक्षिण :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :- सर्व्हे नंबर ४३४ मधील भाग

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

## पान १ वरून...

**भारतीय जैन संघटना,....**

नगरपालिकेच्या माध्यमातून युध्दपातळीवर सुरू आहे. नदीपात्राची मान्सूनपूर्व स्वच्छता आणि खोलीकरण केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक तर होणारच आहे, शिवाय शहरात असलेला पुराचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

पाऊस सुरू होण्यापूर्वी सदरील काम पुर्ण होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम स्वतः कामाच्या ठिकाणी उभे राहून काम करून घेत आहेत. दरम्यान या कामासाठी योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन आदींनी स्वेच्छेने जेसीबी, ट्रॅक्टर इत्यादी साधनसामग्री निःशुल्क उपलब्ध करून दिली आहे. निश्चीतच यामुळे कामाची गती वाढणार असून, काम वेळेत आटोपण्यासाठी मोठी मदत होणार आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी योगदान दिलेल्या भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री.शांतीलाल मुथ्था, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांसह सर्व शासकीय आणि अशासकीय संस्था, संघटनांचे आभार व्यक्त केले आहेत.

**सोलार प्लांटचे वादळी...**

पाण्याअभावी उन्हाळी पिकाचे नुकसान होत असून जनावरांच्या पाण्याच्या पिण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे . १९ में रोजी सरपंच व ग्रामसेवक तलाठी यांनी पंचनामा केला . प्रशासनाने लवकर नुकसान भरपाई शेतकर्याला द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

**कॅप्टन नवनीत कॉवत....**

०५/२०२५ रोजी किंवा त्यापुर्वी ज्यांची खंडीत/अखंडीत (संलग्न/कामकाज/नेमणुक धरुन) ०५ वर्षे सेवा पुर्ण झाली आहे, ते अमंलदार बदलीस पात्र ठरणार आहेत.

२) तालुक्यामध्ये एकापेक्षा जास्त पोलीस ठाणे / शाखा / अपर पोलीस अधीक्षक, कार्यालय/ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय असल्यास त्या तालुक्यामधील कमाल कालावधी सर्व संवर्गामील खंडीत अथवा अखंडीत सेवा धरुन १२ वर्षे पूर्ण झाला असल्यास बदली करण्यात येईल.

३) स्वग्राम तालुकामध्ये नेमणूक असल्यास (पोलीस ठाणे) सदरील अंमलदार यांची बदली करण्यांत येईल.

वरील निकषांची पूर्तता करीत असलेल्या पोलीस अंमलदार यांनी त्यांचे विनंती अर्ज सादर करणे बाबत सर्व पोलीस अंमलदार यांना प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने कळविण्यांत

## पान १ वरून...

आलेले होते. त्या अनुषंगाने आस्थापना मंडळाने प्राप्त अर्ज, वरील निकषा आधारे बदलीपात्र अंमलदार यांचा आढावा घेण्यांत आला. त्यानंतर बदलीपात्र पोलीस अंमलदार यांचे दिनांक १४/०५/२०२५ ते दिनांक १६/०५/२०२५ या कालावधीत पोलीस अधीक्षक, कार्यालय बीड येथे समुपदेशनाव्दारे त्यांचे म्हणणे समक्ष ऐकण्यांत आले.

वरील प्रमाणे निश्चीत करण्यांत आलेल्या निकषाप्रमाणे चालक संवर्ग वगळता खालील प्रमाणे पोलीस अंमलदार बदलीपात्र होते.

विहीत पाच वर्षे कालावधी पूर्ण :- २२९
एकाच तालुका मध्ये १२ वर्षे पूर्ण:- २१६
स्वग्राम तालुका मध्ये नेमणूक :- १६१

विविध पोलीस ठाणेस मंजुर, हजर, रिक्त संख्याबळ, विविध पोलीस ठाणे येथील गुन्हयांची संख्यात्मक माहिती, कायदा व सुव्यवस्था इ. बाबी विचारात घेवून बदलीपात्र पोलीस अंमलदार यांचे पैकी कोणत्या पोलीस ठाणे / शाखा येथे कोणत्या पदाचे किती मनुष्यबळ आवश्यक आहे याबाबतचा आढावा जिल्हास्तरीय आस्थापना मंडळाने घेतला. त्यानुसार संबंधित पोस्टे शाखा येथे किती पदे रिक्त आहेत याबाबत पोलीस अंमलदार यांना त्यांचे समुदपदेशानाव्दारे रिक्त पदांचे ठिकाणी बदली बाबत पसंतीक्रम समक्ष विचारणा करण्यांत आले.

वरील प्रमाणे पोलीस अंमलदार यांचे बदल्या करण्यांत येत असताना आस्थापना मंडळाचे असे निर्दशनास आलेले आहे की, बीड तालुका अंतर्गत असलेल्या पोलीस स्टेशन व शाखा येथून एकूण ६०६ पोलीस अंमलदार यांचे पैकी ३६३ पोलीस अंमलदार हे बीड तालुका मधून बदलीपात्र होते. सदरचे सर्वच बदलीपात्र पोलीस अंमलदार यांची बीड तालुका बाहेर बदली केल्यास बीड तालुका मध्ये मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता भासून ऐनवेळी पोलीस अंमलदार यांचे मनुष्यबळाचा समतोल ढासाळण्याची शक्यता होती. सदर बाबींचा आस्थापना मंडळाने सर्वकष विचार करुन ज्या पोलीस अंमलदार यांचे गंभीर वैद्यकीय अडचण, प्रशासकीय निकड,खेळाडू, तांत्रिक तज्ञ तसेच गंभीर कौटुंबिक, वैद्यकीय अडचण असलेल्या महिला पोलीस अंमलदार यांना प्राधान्य देवून बीड शहरात नेमणूक देणे बाबत निर्णय घेण्यांत आला. त्याप्रमाणे खालील प्रमाणे पोलीस अंमलदार यांना निश्चीत करण्यांत आलेले निकष शिथील करुन नेमणूक देण्यांत आलेली आहे.

## पान १ वरून...

प्रशासकीय कारणास्तव :- ४९ वैद्यकीय कारणास्तवः- १३ खेळाडू (मेडल प्राप्त) :- ०१ तांत्रिक तज्ञ :- ०४

त्याचबरोबर मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमर्स/६/१० बदल्या-परिपत्रक १६२/२०१३ दिनांक २१/०५/२०१३ मधील तरतुदीनुसार पोलीस अंमलदार यांचे सेवानिवृत्तीस तीन वर्षे बाकी असल्यास व त्यांची विनंती असल्यास त्यांच्या स्वतःच्या तालुक्यात नेमणूक देण्यांत आलेली आहे. तसेच ज्या पोलीस अंमलदार यांची सेवानिवृत्ती अत्यंत नजीकच्या काळात (एक वर्षापेक्षा कमी) अशा ३० पोलीस अंमलदार यांना त्यांची बदली न करता त्यांचे मूळ नेमणूकीचे ठिकाणी कायम ठेवण्यांत आलेले आहे. तसेच प्रशासकीय निकड, संबधित पोलीस अंमलदार यांची वैद्यकीय, शैक्षणीक, कौटुंबिक निकड विचारात घेवून एकुण १५ पोलीस अंमलदार यांना एक वर्षे मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

एकंदीत वरील प्रमाणे पोलीस अंमलदार यांचे वार्षीक सर्वसाधारण बदली पात्र पोलीस अंमलदार यांची बदली प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे, निःपक्षपातीपणे व प्रशासकीय निकड लक्षात घेवून पोलीस अंमलदार यांचे बदल्या करण्यांत आलेले असून सदरचे ६०६ पोलीस अंमलदार यांचे बदल्याचे आदेश दिनांक २१/०५/२०२५ रोजी निर्गतिम करण्यांत आलेले आहेत.

# भारतीय स्टेट बँक झिरो बॅलन्स वर खाते उघडणे शिबिर यशस्वी

पैठण ।प्रतिनिधी

शहरातील श्रावस्ती बौद्ध विहार पावर हाऊस येथे दि.२१ बुधवार रोजी एसबीआय बँक रोहिदास नगर पैठण मार्फत झिरो बॅलन्स वर खाते उघडण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले होते भारतीय स्टेट बँक आपल्या दारी या मोहिमे अंतर्गत यावेळी ७० जणांनी आपले खाते उघडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसबीआय बँकेचे मुख्य प्रबंधक शिवेंद्र कुमार पांडेय,प्रमुख अतिथी भुषण काका कावसनकर नगरसेवक नगरपरिषद पैठण,एस बी आय चे सचिन मुसाळे,महेंद्र राजगुरू, सौरभ रावस,सचिन वाकडे यांची उपस्थिती होती.

यावेळी एसबीआय बँकेचे मुख्य प्रबंधक शिवेंद्र कुमार पांडेय यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. शिबिर यशस्वी करण्यासाठी किरण मगरे, राहुल मिरपगार,हर्षवर्धन बनसोडे, रंजित तुपे, दिपक मगरे,तौफिक धांडे, गौतम मगरे, चैतन्य बनकर,फुलचंद साळवे, अशोक मगरे,सुनील कांबळे, साहेबराव वाव्हुळे,कुणाल गणराज, किशोर पगारे, शंकर मगरे,फेरोज पठाण, परवेज धांडे, ऋषीकेश अय्यर,ऋतिक गायकवाड, यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार स्वप्निल साळवे यांनी केले




# मुलींना मोफत १००% शैक्षणिक शुल्क माफ! वास्तव काय?

मुंबई : राज्यातील गरीब व गरजू मुलींच्या शिक्षणासाठी राज्य शासनाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय ८ जुलै २०२४ रोजी परिपत्रक काढून घेतला होता. त्यावेळी हा निर्णय निवडणुकींच्या अगदी तोंडावर होता. या निर्णयाचा मोठ्या प्रमाणात गाजावाजा करण्यात आला. ती योजना म्हणजे मुलींना १००% शैक्षणिक शुल्क माफ करण्याची. ही योजना अत्यंत चांगली आहे. त्यामागील राज्यकर्त्यांचा हेतूही स्वच्छ आणि प्रामाणिक आहे. उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण ५०% असायला हवे, असा उद्देश होता. सध्या ते प्रमाण ३६% आहे. सर्व जाती-प्रवर्गांतील मुलींना लाभ देणारी ही योजना आहे. पण या योजनेची अंमलबजावणी करण्याची प्रशासनाची आणि शैक्षणिक संस्थांची इच्छाच नसल्यासारखी वाटते. प्रथमदर्शनी तरी तसंच चित्र दिसतं. हे या योजनेचं पहिलंच वर्ष आहे, कल्पना आहे, पण या योजनेचे काही बारकावे आपण समजून घेणे आवश्यक आहे. यातील वास्तव राज्यकर्त्यांपुढे येणे देखील तितकंच महत्त्वाचं आहे.

मुलींसाठी मोफत शिक्षण ही योजना मूळतः फक्त पदवी शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी आहे. त्यामध्ये केवळ व्यावसायिक कोर्स करणाऱ्या ५४३ अभ्यासक्रमांनाच या योजनेचा लाभ मिळतो. काही अभ्यासक्रमांची भर घालण्यात आलेली आहे. मात्र, खासगी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिकत असाल तर या योजनेचा लाभ मिळत नाही. उत्पन्न ८ लाखांच्या आत असावे, हा निकष आहे. पदव्युत्तर कोर्सला प्रवेश घेतला असल्यास याचा लाभ मिळत नाही. तसेच तुम्ही याव्यतिरिक्त कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती घेत असाल, तर फक्त एकाच योजनेचा लाभ घेणे बंधनकारक आहे.

या योजनेसाठी वेगळी अर्ज प्रक्रिया नाही. आपण नेहमी ज्या पद्धतीने शिष्यवृत्तीचा अर्ज करतो, त्याच प्रकारे अर्ज भरायचा असतो. प्रवेशाच्या वेळीच या योजनेचा लाभ मुलींना मिळाला, तरच त्याचा खरा फायदा होतो. अन्यथा शैक्षणिक संस्थांचे अधिकारी सर्वप्रथम संपूर्ण शैक्षणिक फी भरण्याचा तगादा लावतात आणि वसुली करतात. नंतर परतावा दिला जाईल असे सांगून वेळ मारून घेतात. परिणामी पालक व विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येतो. परीक्षा देण्यासाठी संपूर्ण शुल्क भरले असेल, तरच विद्यार्थिनींना परीक्षेला बसू दिले जाते. अर्ज प्रक्रियेची गुंतागुंत असल्याने अनेक मुली अर्ज भरणे टाळतात. जर सुरुवातीसच या योजनेचा लाभ दिला गेला, तर लाखो मुलींना मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. मात्र,



आधी फी भरा, नंतर परतावा मिळेल असे म्हटले जाते, तेव्हा समजावे ही योजना केवळ कागदोपत्री आहे. सध्या दहावी-बारावीचे निकाल लागले आहेत. शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. तरीही या योजनेबाबत प्रशासन वा शैक्षणिक संस्था कोणतीही प्रसिद्धी करताना दिसत नाहीत. कुठेही कॅम्पस किंवा प्रसारमाध्यमांतून जाहिरात लावलेली नाही. पालक संभ्रमात आहेत. कोणीही माहिती देत नाही, काय करावे हे त्यांना सुचत नाही.

वर्षभरात केवळ ५७२० मुलींचेच अर्ज पात्र

दुसरी बाजू अशी की, सामाजिक क्षेत्रातील काही संस्था मुलींना शैक्षणिक फी माफ झालेली आहे असे समजून मदत करण्यास नकार देत आहेत. यामुळे विद्यार्थिनींची कोंडी झाली आहे. मागील शैक्षणिक वर्षात या योजनाबाबत माहिती घेतली असता, उच्च शिक्षण विभागाने केवळ ५७२० मुलींचेच अर्ज पात्र ठरवले असल्याचे सांगितले. तरीही अद्याप फी परतावा झालेला नाही. या योजनासाठी शासन दरवर्षी ९०५ कोटींची तरतूद करणार आहे, असे शासन निर्णयात नमूद आहे. मात्र, समन्वयाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. विद्यार्थिनी केंद्रबिंदू ठेवून या प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व समाविष्ट केल्यासच ही योजना गरजूंपर्यंत पोहोचू शकते. अन्यथा आपण केवळ कोट्यवधींचे आकडे वाचत राहू, आणि मुलींची शैक्षणिक अवस्था 'जैसे थे' राहील.

# कृषी केंद्रात बोगस बियाणे औषध आढळल्यास कारवाई होणार......!

## जास्त पैसे देऊन सरकी बॅग घेऊ नका......!

पैठण ।प्रतिनिधी

शेतातील पेरणी मशागतीचे कामे आटोपुन शेतकरी मोसमी पावसाची प्रतीक्षा करत आहे सध्या शेतकऱ्यांना खरिपाच्या पेरणीचे वेध लागले आहेत त्यासाठी सध्या जिल्हाभरात शेतकऱ्यांची बियाणे खरेदीची लगबग सुरू आहे मात्र आईन पेरणीच्या तोंडावर राज्यांमध्ये बोगस बियाणे विकणाऱ्याचा राज्यात सुळसुलाट होण्याच्या अगोदर शेतकरी बोगस बियांना पासून वाचतील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे बोगस बियाणामुळे कपाशीची पहिली वेचणी चांगल्या प्रकारे होती पण दुसऱ्या वेचणीला बोंड आळी चे प्रमाण वाढतच जातात शेतकऱ्यांना पहिल्या फ्लॅश मध्ये काय माल व्हायचं होतं पण दुसऱ्या वेचनीला कपाशी होत नाही कितीही फवारणी केल्याने बोंड आळी जात नाही बियाणाची जिल्ह्यातील व तालुक्यातील बोगस खते औषधे आणि बियाणे विक्री मोठ्या प्रमाणावर होत असती त्यामुळे कृषी विभागाने धाडसत्र सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे

चांगल्या उत्पादनासाठी तितक्याच दर्जेदार बियाणाची आवश्यकता असते सध्या विविध कंपन्या बियाणे विक्रीच्या



जाहिरात देऊन शेतकऱ्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात अशा जाहिरातींना बळी पडून शेतकऱ्यांची बियाण्याच्या बाबतीत फसवणूक होऊ शकते अशा परिस्थितीत योग्य बियाणाची निवड करणे हे जास्त महत्त्वाचा असतं परमुख्याने बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रामाणिक केलेले बियाणे खरेदी करण्यास प्रधान्य द्यावे बियाणे खरेदी करताना टॅबोर पिकाच्या जातीचे नाव बियाण्याचा प्रकार गट क्रमांक उत्पादकाचे नाव आणि पत्ता बीज परीक्षणाची तारीख व उगवण शक्ती टक्केवारी बियाणाच्या शुद्धतेचे प्रमाण इत्यादी गोष्टी तपासा याशिवाय पिशवीवर बियाण्याची वजन विक्रीची किंमत आणि विक्रेत्याची सही इत्यादी मोदी तपासून पहा यामध्ये प्रमुख्याने बियाण्याची उगवण क्षमता बौद्धिक शुद्धता बियाणाच्या चाचणीची तारीख इत्यादी गोष्टी काळजीपूर्वक वाचा या माहितीची खात्री झाल्यानंतरच विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करा खरेदी केल्यानंतर बियाण्याचे बिल नक्की घ्या आणि जपून ठेवा यावरील पीक वाहन आणि गट क्रमांक बियाणाच्या खरेदीची तारीख लिहिल्याची खात्री करा मदत बाह्य तसेच पॅकिंग न भरलेले बियाणे अजिबात खरेदी करू नका भविष्यात जर बियाण्याचा काही दोष आढळला तर तक्रार करताना सगळ्या गोष्टी उपयोगी पडतात त्याशिवाय तक्रार ग्राह्य धरली जात नाही.

# मुख्याध्यापक अशोक थळपती तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम

प्रतिनिधी @ माजलगांव

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे मार्फत सन २०२२-२३ मध्ये शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा जिल्हा व तालुकास्तरावर गटनिहाय आयोजित केली होती. या स्पर्धेत जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील मूकबधिर निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक महालिंग थळपती यांनी सहभाग घेऊन दिव्यांग मुलांना उपयोगी पडेल असा दर्जेदार व्हिडिओ निर्मिती करून तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळवला आहे.

बक्षिस वितरण समारंभ दि. २१/०५/२०२५ रोजी योगेश्वरी नूतन विद्यालय अंबाजोगाई येथे संपन्न झाला. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व जिल्हा शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने सारुख




साहेब व ईतर मान्यवरांच्या हस्ते बक्षीस, रक्कम, प्रमाणपत्र व ट्रॉफी देउन अशोक थळपती व प्रकाश प्रल्हादराव आगे यांचा विशेष शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष विकास देवीदासराव कदम यांनी अभिनंदन केले आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त भव्य तालुकास्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन

## ब्राह्मण समाजातील इयत्ता १० वी.१२ वी.च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा होणार संपन्न

मकरंद चिनके /गंगाखेड

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त भव्य तालुकास्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन (दि.२८ मे बुधवार) रोजी करण्यात आले आहे.शहरातील स्वातंत्र्यविर वि.दा.सावरकर बहुऊद्देशिय सेवाभावी संस्था,स्वातंत्र्यविर वि.दा. सावरकर सार्वजनिक वाचनालय,सर्व शाखीय ब्राह्मण समाज प्रतिष्ठान व गोदावरी स्वच्छता अभियान गंगाखेडच्या वतीने सावरकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य तालुकास्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून.प्रसिद्ध व्याख्यात्या प्रा.शरयू मुकुंद अंबेकर यांचे व्याख्यान संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी नगराध्यक्ष रामप्रभू मुंडे,अध्यक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.दिलीप टिपरसे, ज्येष्ठ विधीज्ञ ड.नंदकुमार काकांनी, भाजपा तालुकाध्यक्ष रवी कुमार जोशी यांची



उपस्थिती लाभणार आहे.

सदरील आयोजित स्पर्धेमध्ये इयत्ता सातवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभाग घेता येणार आहे. स्पर्धकांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवन चरित्रावर आधारित सुवाच्छ अक्षरात लेख लिहून आपले नाव इयत्ता व शाळेचे नाव मोबाईल नंबर लिहून दिनांक १ मे रविवार रोजी कराड इंटरनॅशनल स्कूल रेल्वे स्टेशन जवळ येथे सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत स्वतःआणून द्यायचे आहे. स्पर्धेतील विजेत्यांना दिनांक २८ मे सावरकर यांच्या जयंती दिनी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भव्य बक्षीस वितरण होणार आहे. तसेच नुकत्याच शालांत प्रमाणपत्र परीक्षा मध्ये ब्राह्मण समाजातील इयत्ता १० वी.१२ वी.च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा व प्रमाणपत्राचे वाटप होणार आहे. हस्ताक्षर स्पर्धेतील स्पर्धकांनी अधिक माहितीसाठी संस्थेचे अध्यक्ष देवानंद जोशी ८८०५२६६०७२, सचिव रूपाली जोशी ९३२५४१६९०९,नागेश केरकर ९८९००२०९१२

# बालविवाह व बालमजूरी आढळून आल्यास कडक कारवाई करणार - तहसिलदार वैशाली पाटील

## आष्टीत बाल संरक्षण समितीची बैठक संपन्न

प्रतिनिधी @ आष्टी

तालुक्यात बालविवाहाच्या घटना घडू नये, अल्पवयीन मुलांकडून काम करुन न घेता बालमजूरी थांबावी यासाठी प्रबोधन, जनजागृती करत असतांना कठोर उपाययोजना कराव्यात. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा प्रकरणातील जबाबदार व्यक्ती व दोषींवर कडक कारवाई करा, असे निर्देश आष्टीचे तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यात बालविवाह मुक्त व बालमजूरी यासाठी आष्टी तालुक्याची बालसंरक्षण समितीची बैठक तहसिलदार वैशाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात बुधवार दि. २१ में रोजी सकाळी १२ वाजता संपन्न झाली. यावेळी पुढे त्यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, शिक्षण विभाग, पंचायत विभाग, आरोग्य विभाग, गाव पातळीवरील पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा



वर्कर यांसारखे कर्मचारी यांची बालविवाह रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यासाठी बाल कामगार, शाळामधून, मुले यांबाबतही जनजागृती करण्यात यावी, ग्रामस्तरावर ग्राम कृती दल स्थापन करण्यात यावे. ग्राम बाल संरक्षण समिती, शाळा व्यवस्थापन समिती यांसारख्या समित्यांमधील सदस्य ही महत्त्वाचे योगदान देऊ शकतात.

बालविवाहाच्या घटना घडल्यास त्यास जबाबदार व्यक्तिंवर कारवाई होणे आवश्यक आहे. नागरिकांनी आपल्या सभोवताली कुठे बालविवाह होत असल्यास त्याची माहिती १०९८ व ११२ या टोल फ्रि क्रमांकावर द्यावी. माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवले जाईल, असेही तहसीलदार पाटील यांनी बोलताना सांगितले. या बैठकीस बाल संरक्षण समितीचे सचिव बाल एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, बाल संरक्षण समितीचे सदस्य पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, आरोग्य विभागाचे प्रतिनिधी डॉ. पवन इंगोले, स्थानिक सामाजिक प्रतिनिधी अविनाश कदम, अनिरुद्ध धर्माधिकारी, विकास मस्के, बाल प्रतिनिधी प्रतिक अशोक पवार, ओम वाल्हेकर, शिक्षण विभागाचे सोनवणे, बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी राजेंद्र गळगटे आदी संरक्षण समितीचे सदस्य उपस्थित होते.

मंगल कार्यालय चालकांनी पुराव्यानिशी लग्न बुकींग करावीत

तालुक्यातील सर्व विवाह मंगल कार्यालये, फंक्शन हॉल चालकांनी वधू आणि वर यांच्या जन्मासंबंधी पुरावा म्हणून आधार कार्ड न घेता निर्गम उतारा किंवा शाळेचा दाखला पुरावा घेण्यात यावा. तेंव्हाच विवाहाची बुकींग करून घ्यावी. अन्यथा बाल विवाह झाल्यास संबंधित मंगल कार्यालय चालक व बॅन्ड, वाजंत्री वाले, आचारी आणि इतर व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिले.

# ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्कारास हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे-शेख फेरोज

प्रतिनिधी @ माजलगांव

राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि.२४ शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.या नागरी सत्कारास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख यांनी केले आहे.




शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या या नागरी सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे असणार आहेत.तर स्वागत अध्यक्ष उपसभापती श्रीहरी मोरे, सचिन डोंगरे हे भूषवणार आहेत. त्याचप्रमाणे कार्यक्रमात माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाश सोळंके आ.सुरेश धस,आ. विजयसिंह पंडित,आ.नमिता मुंदडा,शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे.दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समिती नवनाथ धायजे,राजेश साळवे, भीमराव टाकणखार,प्रशांत ससाने, सदानंद प्रधान,मुरलीधर साळवे, सचिन जावळे,विठ्ठल पंडित,राहुल मस्के,अशोक लांडगे,प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर,बाबा शेख,विजय धाईजे,विनोद शिंदे,अभिजीत पोटभरे,अक्षय मोरे,सदानंद प्रधान, बाबा वाघमारे,नितिन काळे,किरण खळगे,विजय साळवे,धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे,विठ्ठल पंडित,लखन हजारे इत्यादी बहुजन विकास मोर्चाची सर्व टीम काम करीत असून या कार्यक्रमास हजारच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चेचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख फिरोज यांनी केले आहे.

# चिंचाळा येथे ढगफुटी शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

आष्टी परिसरात मुसळधार पाऊस

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यातील चिंचाळा, बेलगाव, मांडवा, ब्रह्मगाव, कडा व आष्टी परिसरात गुरुवारी सायंकाळी पाच वाजता जोरदार मुसळधार पाऊस होऊन शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. आष्टी तालुक्यात मुसळधार पाऊस पडला आहे. यंदा मे महिन्यातचे गेल्या पाच ते सहा दिवसापासून अवकाळी पावसाने धुमाकूळ माजवला असून खरिपाच्या पेरण्याला अवधी असताना शेतीला तळ्याचे स्वरूप आले असून नदी, नाले अवकाळी पावसाने ओसंडून वाहायला लागले असून शेताच्या ताली फुटून शेतातील कांदा पिकासह शेतातील मालाचे अतोनात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.



# वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते होणार सन्मान

## जगद्विवेक प्रतिष्ठानकडे गुणवंतांनी नोंदणी करावी - विकास स्वामी, वैभव स्वामी

बीड ।प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. अशा विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. सत्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी जगद्विवेक प्रतिष्ठानकडे संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी आणि सचिव वैभव स्वामी यांनी केले आहे.

जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष आदर्श मुख्याध्यापिका शिवैक्य जगदेवी विवेक स्वामी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते २५ जून रोजी सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी देखील २५ जून २०२५ रोजी बीड येथील स.मा. गर्गे भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या जवळ, तुळजाई चौक,बीड येथे लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. या सत्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपला मार्क्स मेमो, संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता तालुका जिल्हा पिन कोड सह, तसेच पासपोर्ट फोटो १० जून पर्यंत व्हाट्सअप नंबर ९४ २२ ७४ ४६ ०५ प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी यांच्या नंबर वर पाठवून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष सौ वैशाली स्वामी, सहसचिव सौ रुपाली स्वामी, कार्याध्यक्ष सौ वनमाला स्वामी, समन्वयक सौ वर्षा स्वामी, सदस्य शशांक स्वामी, वेदांत स्वामी तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, प्रशांत स्वामी, सतीश स्वामी, नागेश स्वामी, राजेश स्वामी आदींनी केले आहे.

प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक

इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वी परीक्षेमध्ये वीरशैव लिंगायत समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी सत्कार स्वीकारण्यासाठी जगद्विवेक प्रतिष्ठान कडे नोंदणी केली आहे. अशा विद्यार्थ्यांमधून जे विद्यार्थी दहावी आणि बारावी दोन्ही वर्गातून स्वतंत्ररित्या प्रथम येतील त्यांना ११०० रुपये रोख बक्षीस तर द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ७०० रुपये बक्षीस तसेच तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार असून उत्तेजनार्थ निवडलेल्या विद्यार्थ्यास २५१ रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

जंगम समाजातील गरजवंतांस ऑपरेशनसाठी मदत करणार

जंगम स्वामी समाजातील ज्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे. मात्र ऑपरेशन साठी पैशाची नितांत गरज आहे.अशा व्यक्तीची खात्री पटल्यानंतर त्यांना दहा हजार रुपयापर्यंत ऑपरेशनसाठी आर्थिक मदत स्वर्गीय जगदेवी विवेक स्वामी यांच्या स्मरणार्थ करण्यात येणार आहे. तेव्हा ज्यांना डोळ्याचे ऑपरेशन करायचे आहे मात्र आर्थिक परिस्थिती ऑपरेशन करण्यासारखी नाही अशा गरजवंत जंगम स्वामी समाजातील गरजवंतांनी आपले संपूर्ण नाव, गाव, तालुका, जिल्हा तसेच ऑपरेशन संदर्भात डॉक्टरांनी दिलेले रिपोर्ट्स हे ९४ २२ ७४ ४६ ०५ या भ्रमणध्वनीवर पाठवावेत. ज्यांना खरंच केवळ पैश्या अभावी ऑपरेशन थांबलेले आहे. अशाच एका गरजवंतांची निवड करून त्यांना आर्थिक मदत करण्यात येईल. तेव्हा गरजवंतांनी तात्काळ नोंदणी करावी असे जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.



## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीची कार्यकारिणी जाहीर.....!

पैठण ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील सालाबाद प्रमाणे याही वर्षी राजमाता पुण्यश्लोक यांची ३०० वी जयंती ३१ में या दीवशी मोठ्या उत्साहाने साजरी होणार आहे जयंतीच्या निमित्ताने कार्यकारणी बैठक पार पडली या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या बैठकीमध्ये अध्यक्षपदी- पवन राजेंद्र तांगडेउपाध्यक्षपदी-सचिन मगरे व साजिद पठाण कार्याध्यक्ष प्रसाद कुलकर्णी अमोल मोदानी सचिव- विजय राऊत चिटणीस- कुणाल जगताप सरचिटणीस -सुनील घनवट यावेळी यांची नियुक्ती करण्यात आली यावेळी बैठकीमध्ये उपस्थिती जिल्हा नियोजन समितीचे राजेंद्र वाघमोडे मा. उपसरपंच चंद्रशेखर सरोदे बद्रीनाथ थोटे अरविंद तांगडे चंद्रभान चोरमले मुस्तफभाई पठाण राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती दावरवाडीतील सर्व धनगर समाज बांधव व गावातील नागरीक यांची यावेळी उपस्थिती होती

# पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावी ऑनलाइन प्रवेश नोंदणी सहायता कक्षाची स्थापना




शिरूर कासार ।प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५- २६ या वर्षी संपूर्ण राज्यात अकरावी वर्गाची प्रवेश प्रक्रिया केंद्रे ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याने त्या अनुषंगाने आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे अकरावी ऑनलाइन प्रवेश नोंदणी सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.या नोंदनी कक्षाचा शुभारंभ प्राचार्य अंगदराव दहिफळे यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी उच्च माध्यमिक भाऊसाहेब सोडंगे माध्यमीक पर्यवेक्षक दीपक रत्नपारखी प्रा बळीराम तांदळे प्रा धर्मराज मुंडे प्रा रजनीताई इंगोले शंकर सानप आदी सह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते विद्यार्थ्यांना अकरावी वर्गाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी सकाळी १० ते ५ यावेळेत सहायता कक्ष कार्यरत राहील सदरील केंद्रावर अकरावी वर्गाची ऑनलाईन प्रवेश नोंदणी होणार आहे तरी महाराष्ट्रातील कोणत्याही शाळेतील इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक विद्यालयातून ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल असे आव्हान प्राचार्य अंगदराव दहिफळे यांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे- राजेंद्र मस्के

## विधानसभा निवडणुकीत जे झाले ते मी विसरून गेलो आहे-महेबुब शेख

बीड ।प्रतिनिधी

काही दिवसांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या असून या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आष्टी येथे तालुका स्तरीय बैठक बोलवण्यात आली होती. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीस जिप सदस्य सतीश शिंदे, प्रदेश सचिव ड.नरसिंह जाधव, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, तालुका अध्यक्ष परमेश्वर शेळके,संजय थोरवे,राम खाडे, मिसाळ पाटील, मिर्झा बेग,तांबेताई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने गर्दी केली होती.

बैठकीस संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की,लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्या,




आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार आहेत.या निवडणुकांमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे. आष्टी मतदार संघातील लोक व कार्यकर्ते शरद पवार साहेबांना मानणारा आहे. आष्टी मतदार संघात सत्ता असो अथवा नसो पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. या कार्यकर्त्यांच्या जीवावर पक्ष उभा राहिला. निष्ठेने काम करून कार्यकर्त्यांनी निवडणुकीत विजय मिळवून दिला. परंतु विजय झाल्यानंतर अथवा सत्तेत गेल्यानंतर कार्यकर्त्यांचा विचार आमदारांनी केला नाही अशी खंत ही काही कार्यकर्त्यांनी या बैठकीदरम्यान व्यक्त केली.

आगामी काळातील निवडणुकांत विजय होण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. विधानसभा निवडणुकीत जे काही झाले ते सर्व मी विसरून गेलो आहे. सामान्य कुटुंबातील एक कार्यकर्ता म्हणून मी काम करतो. पक्ष मजबुत करून पक्षाला विजय प्राप्त करून देण्यासाठी माझी धडपड आहे. शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वात आपला पक्ष कायम जनमानसात अग्रेसर आहे. निष्ठावान व मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी ही आजची आढावा बैठक आहे.

# अंबाजोगाईच्या लेकी नंतर जावयानेही केले केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादित

## अंबाजोगाईकरांच्या मानपानात लेकीनंतर जावायाच्या रुपानेही मानेचा तुरा

अंबाजोगाई / सुनील सिरसाट

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नुकत्याच पार पडलेल्या परीक्षेमध्ये आंबेजोगाईच्या जावयाने क्रमांक दोन (२) रँक संपादित करीत मोठे घवघवीत यश संपादित केले आहे. नुकत्याच यु.पी.एस.सी. च्या अंतिम निकालात अंबाजोगाई येथील नामांकित मेडीसीन तज्ञ डॉ.सौ.शुभदा अभिजीत लोहिया-राठी आणि निवृत्त प्रा.अभिजीत द्वारकादासजी लोहिया यांचे जावई आनंद खंडेलवाल यांनी आय.एफ.एस. साठी संपादित केलेल्या दैदिप्यमान यशाने लोहीया-राठी कुटुंबासह संपूर्ण अंबाजोगाईकरांच्या शिरपेचात आणखी एक मानेचा तुरा खोवला गेल्याने लेकीच्या म्हणजेच मुलगी अनुष्काच्या मोठ्या यशा पाठोपाठ जावईबापुनेही सासरवाडीची मान




मोठ्या प्रमाणात उंचावली असून आय.एफ.एस. लेकीच्या यशाचा आनंद पूर्णतः विरघळला नाही तोवरच जावायाने त्या आनंदात मोठी भर टाकली असून आनंद च्या यशाने हा आनंद आता नक्कीच द्विगुणित झाला आहे. अंबाजोगाईच्या इतिहासातील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत एवढे घवघवीत यश संपादित करणारे हे पहिले दाम्पत्य असुन यापूर्वी अशा अद्वितीय यशाचे मानकरी कुणीही ठरले नसल्याची चर्चा अंबानगरीत सर्वत्र ऐकावयास मिळते आहे.लोहिया-खंडेलवाल दाम्पत्याचे आणि संपुर्ण परिवाराचे आनंद यांच्या या यशाने यानिमित्ताने पुन्हा एकदा सर्वत्र भरभरून कौतुक होत असून आनंद-अनुष्का यांच्यावरती वरुणराजासह सर्वच स्तरातून आणि विशेषतः मित्र-मैत्रिणी, स्नेही, नातेवाईक आणि सभोवतालच्या परिसरातील परिचीतांकडून अभिनंदनाचा वर्षाव होतो आहे.

पत्नी अनुष्काचे योगदान ठरले अनमोल - आनंद

मी जरी आज केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आय.एफ.एस प्रकारात संपूर्ण देशातून क्रमांक दोन (२) च्या रँक ने उत्तीर्ण होत यश प्राप्त केलेल असले तरी यात आई-वडील, सासू-सासरे यांच्या आशीर्वादासह माझी पत्नी अनुष्का जी की, माझ्या अगोदर वर्षभराने याच परीक्षेत संपूर्ण देशात क्रमांक चार (४) रँकने तर महाराष्ट्र राज्यात पहिल्या रँकने आय.एफ.एस. प्रकारात उत्तीर्ण झाली होती. तिने तिचा कार्यालयीन कार्यभार व कुटुंब सांभाळून मला केलेले सहकार्य मी शब्दात सांगू शकत नाही. म्हणून याप्रसंगी मी एवढेच म्हणेल की, माझ्या या प्रवासात पत्नी अनुष्काचे योगदान अगदी मोलाचे असून ते माझ्यासाठी अनमोल ठरले आहे.

## ऑपरेशन सिंदूर भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ भाजपा तर्फे सन्मान तिरंगा रॅली



शहागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील शहागड येथे भारतीय सैन्य दलाच्या पराक्रमाला सलाम ऑपरेशन सिंदूर राबविणाऱ्या भारतीय सैन्य दलाला समर्थन देण्यासाठी शहागड मंडळ ता.अंबड येथील राष्ट्रप्रेमी नागरिक भरतीय जनता पार्टीच्या वतीने देशाच्या सीमांवर आपल्या सैनिकांनी दाखवलेला पराक्रम,त्याग व शौर्य यांचा सन्मान करण्यासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या नेतृत्वाखाली शहागड येथे भव्य तिरंगा पायी रॅली काढण्यात आली. यावेळी माजी सैनिक दादासाहेब बोचरे, सैनिक स्वानंद लोने,माजी सैनिक पंडित राठोड, माजी सैनिक रमेश शेळके सैनिंकाचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला ही भव्य तिरंगा रॅली शहागड बस स्थानकासमोरुन जिल्हा परिषद हायस्कूल ते शहागड बस स्थानक समोर समारोपण करण्यात आले या रॅलीत मोठ्या संख्येने देशप्रेमी सहभागी झाले होते.भाजपा जिल्हा उपाध्यक्ष दिपकसिंह ठाकूर,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अवधूत नाना खडके,ऊप सभापती आरुन घुगे राजू छल्लारे सर,रमेश शहाणे,झुंजळे आंबा,प्रदीप पवार,भगवान दादा बर्वे, अनिरुद्ध झिंजुर्डे, शिवाजी नाना मोरे, अरुण घुगे, डॉ.रमेश तारगे, इरफान सय्यद.इम्रान पठाण.ईमतियाज मनीयार बाबुराव वाळेकर अर्जुन वाहघ संदीप फटंगळे भगु दादा बर्वे शोभालाल उंबरे. अशोक बोधे. नजीर शहा नारायण बर्डे समीर शेख महेश कांबळे. आबासाहेब पवार. गणेश शेरकर. संतोष जाधव. इक्बाल बागवान. आसिफ कुरेशी. जमीरुद्दीन बागवान. गावातील सर्व समाज बांधव.

# परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज करण्यास ६ जून पर्यंत मुदतवाढ

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) मधील विद्यार्थ्यांसाठी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १७ मे २०२५ अशी होती. ही मुदत वाढवून ६ जून २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी परदेश शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

परदेशातील क्यूएस रँकिंग २०० मधील परदेशी संस्थांमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. ही शिष्यवृत्ती शाखानिहाय व अभ्यासक्रमनिहाय दिली जाते.

परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्जाचा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्त्वाच्या अटी व शर्ती इत्यादी सविस्तर माहिती विभागाच्या www.maharashtra.gov.in किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज या संकेतस्थळावरुन डाउनलोड करून, परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह ६ जून २०२५ रोजी सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला, एम. एच. बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स समतानगर, येरवडा पुणे-४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा.

## ड्रोन बंदीमुळे शेतकऱ्यांची फवारणी अडचणीच्या कचाट्यात !

बीड ।राजयोग प्रतिनिधी

केंद्र सरकारने सर्व प्रकारचे ड्रोन बंदी केल्याने जे शेतकरी फवारणीसाठी ड्रोनचा वापर करीत आहेत ते अडचणीत सापडले असल्याने या बंदी चा केवळ शेतीसाठी फेरविचार करावा अशी विनंती कामगार नेते राजकुमार घायाळ यांनी जिल्हा प्रशासनास भेटून केली आहे.

बीड जिल्ह्यातील अनेक शेतकरी यांनी फळबागासाठी मृग बहार घेण्यासाठी झाडे ताणावर सोडली. मात्र अचानक आलेल्या पुर्व मोसमी पावसाने झाडाला ताण न बसता ताण तुटल्याने फळझाडाना तातडीने फवारणी करणे अवश्यक आहे. करीता ड्रोनने केलेली फवारणी प्रभावी होते असे तज्ञ सल्ला देतात. पण ड्रोण बंदी घातली असल्याने शेतक-याची अडचण झाल्याने प्रशासनाने बंदीचा फेरविचार करावा अशी विनंती केली आहे.

## आवडे उंचेगाव येथील वसंतराव नाईक उच्चमाध्यमिक शाळेचा ९७ टक्के निकाल .....!

पैठण ।प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील आवडे उंचेगाव येथील असलेली वसंतराव नाईक उच्च माध्यमिक शाळेचा निकाल एस.एस.सी ९७ टक्के लागला यामध्ये प्रथम आलेली मुलगी कुमारी सानिका लांडगे ८९.२० या शाळेत गुण मिळवून प्रथम आली द्वितीय क्रमांक कु.पूजा गरजे ८७.२० टक्के गुण मिळविले तृतीय क्रमांक कू. ज्ञानेश्वरी वैद्य ८६.६० टक्के गुण मिळून प्राप्त केले इयत्ता बारावी शाखेमधून प्रथम आलेली मुलगी कु.भावना रसाळ८०.६७ टक्के गुण



मिळविले द्वितीय क्रमांक कू.आरती जाधव ७६.५० टक्के तृतीय क्रमांक स्वाती पाहिजे ७३. टक्के गुण मिळाले त्यावेळी प्रथम आलेल्या मुलींचा सत्कार करण्यासाठी प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष डॉ.भारत झारगड



पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षण प्रसारकच्या सौ.सखु झारगड बाळासाहेब झारगड प्राचार्य विजय लोखंडे संचालक सुधीर कानडे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने प्रथम आलेल्या सर्व मुलींचा सत्कार करण्यात आला

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# परभणीत सैनिकांच्या सन्मानार्थ निघाली तिरंगा रॅली -शिवसेनेचे आयोजन

## जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांचे मार्गदर्शन

परभणी ।प्रतिनिधी

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरमधून अतिरेक्यांना दिलेल्या सडेतोड उत्तराबद्दल आणि भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या मार्गदर्शनात परभणी शहरात तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन गुरुवार (दि. २२) रोजी करण्यात आले.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील अतिरेकी व दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करून पाकिस्तानचे संरक्षणदृष्ट्या महत्त्वाचे अनेक स्थळे उध्वस्त केले. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ व नागरिकांत देशप्रेमाचे भावना रुजावी, सीमेवरील सैनिकांचे मनोबल वाढावे यासाठी शहरातून तिरंगा बाईक रँलीचे आयोजन करण्यात आल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांनी यावेळी सांगितले.



ही रॅली शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयापासून सुरू करून वसमत रस्तामार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा - रेल्वे स्थानक - बस स्थानक - उड्डाणपूल - विसावा चौकमार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात पोहोचली. येथे भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून अतिरेक्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना व भारतीयांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शेवटी राष्ट्रगीताने बाईक रॅलीचा समारोप करण्यात आला.

या तिरंगा बाईक रॅलीत जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, माझी खासदार सुरेशराव जाधव, लोकसभा प्रमुख राजू कापसे, भास्करराव लंगोटे, महिला आघाडी प्रमुख गीता सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख माणिक पौंढे, प्रल्हाद होगे, विधानसभा प्रमुख बाळासाहेब पानपटे, तालुकाप्रमुख प्रभाकर कदम, युवासेना जिल्हाप्रमुख आप्पाराव वावरे, युवासेना शहर प्रमुख ईशान अवचार, युवासेना उपशहर प्रमुख राहुल शिंदे ,सखुबाई लटपटे, कल्पना दळवी, अर्चना चिंचाणे, शीलाताई शेटे, पूजाताई शेटे, युती जिल्हाप्रमुख प्रीती घुले, शेख शबीर, सचिन पाटील, बाळासाहेब मोहटे, कैलास पांगरकर, महेंद्र जोंधळे, भूजंगराव धस, संदीप जाधव, सरपंच उद्धवराव गायकवाड, संजय बेटकर, गुलाबराव पंढरकरून, अजित गरुड, गोविंदराव जोगदंड, शिव प्रसाद लोखंडे, लक्ष्मण आरमाळ, उमाकांत भरोसे, पप्पू खुळे, सुभाषराव गरुड, बंडू झाडे, ज्ञानेश्वर रसाळ, ज्ञानेश्वर शिंदे आदींसहीत शहरातील महिला, युवक - युवतींनी मोठ्या संख्येने बाईक रॅलीत सहभाग घेतला.

# वीर शिवलिंगायत समाजासाठी स्मशानभूमी उपलब्ध करुन द्या

## रुद्र भुमी समस्या निवारण समितीद्वारे मागणी : आमदार संजय केणेकर यांना दिले निवेदन

**परभणी ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाकडून सर्व लिंगायत समाजाला (सर्व पोट जातीसह) आवश्यक त्या गावांमध्ये सर्व सोयींनी युक्त अशा स्मशानभूमी मिळवून द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र वीर लिंगायत सभा पुणे प्रणित महाराष्ट्र प्रदेश रुद्र भूमी समस्या निवारण समितीच्या वतीने आमदार संजय केणेकर यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

**महाराष्ट्र प्रदेश वीरशैव लिंगायत रुद्र भूमी समस्या निवारण समितीच्या पदाधिकार्यांनी बुधवार २१ मे रोजी आमदार केणेकर यांची भेट घेतली, यावेळी लिंगायत समाजाच्या रुद्र भूमी संबंधी समस्यांबद्दल सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्र शासनाकडून सर्व लिंगायत समाजाला (सर्व पोट जातीसह) आवश्यक त्या गावांमध्ये सर्व सोयींनी युक्त अशा स्मशानभूमी मिळवून द्याव्यात, या मागणीसंदर्भात निवेदन देण्यात आले.**

यावेळी आमदार केणेकर यांनी हा केवळ लिंगायत समाजाचा प्रश्न नसून माझ्या सुद्धा अस्मितेचा प्रश्न आहे, त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषदे मध्ये या प्रश्नी वाचा फोडून हे काम तात्काळ मार्गी लावू, असे आश्वासन देवून आपण या कामी कायम तुमच्या समाजाच्या पाठीशी राहु, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच स्मशानभूमीबाबतची ही मागणी शासन दरबारी मांडण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत समितीच्या पदाधिकार्यांची मुंबई येथे बैठक आयोजित करून देण्याची समितीची विनंतीही आमदार केणेकर यांनी तात्काळ मान्य केली.

या बैठकीसाठी रुद्र भूमी समस्या निवारण समितीचे प्रदेशाध्यक्ष महेशआप्पा शेटे (अकोला), प्रदेश कार्याध्यक्ष विजयकुमार शाहीर (छ. संभाजीनगर), प्रदेश उपाध्यक्ष अंबादास आप्पा आंधळकर (नाशिक), प्रदेश उपाध्यक्ष रामेश्वरआप्पा लांडगे ( छ. संभाजीनगर), सदस्य शिवलिंगआप्पा खापरे (परभणी), प्रशांत आप्पा बोधेकर (चिखली), म.वी. लिं. सभा छ. संभाजीनगर जिल्हाध्यक्ष रवींद्रआप्पा पाटणे, जिल्हा सचिव उदय आप्पा गुळवे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुभाष आप्पा भायभंग, ग्रामीण कार्याध्यक्ष बबन आप्पा वाळेकर यांची उपस्थिती होती.

दरम्यान, आमदार संजय केनेकर हे विधान परिषद सदस्यपदी निवडून आल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश वीरशैव लिंगायत रुद्र भूमी समस्या निवारण समितीच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराजांची प्रतिमा भेट देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स दुकानाला लागली आग; साहित्य जळून खाक

परभणी ।प्रतिनिधी

शहरातील वसमत रस्त्यावरील विठू माऊली फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स या दुकानाला बुधवार (दि. २१)रोजी पहाटे लागलेल्या आगीत दुकानातील साहित्य जळून खाक झाले आहे. या आगीत ३५ ते ४० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र आग लागण्याचे नेमके कारण समजू शकले नाही.

आग लागलेल्या घटनेची माहिती विनोद दुधाटे यांनी शहरातील अपना कॉर्नर परिसरातील अग्निशमन दलास दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे डी. यु. राठोड, निखिल बेंडसुरे, अक्षय पांढरे व वसीम अखिल अहमद यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेत आग आटोक्यात आणली. आगीच्या या घटनेत फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स दुकानातील फर्निचर आणि



**३५-४० लाखांचे नुकसान झाल्याचा अंदाज**

इलेक्ट्रॉनिक वस्तुंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आगीत जवळपास ३५ ते ४० लाख रुपये नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. (छाया: उत्तम बोरसुरीकर)

# अहिल्यानगरकरांनो सावधान! जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट, कधीपर्यंत पहा

अहिल्यानगर / प्रशांत बाफना

गेल्या आठ दिवसांपासून अहिल्यानगर जिल्ह्यात मान्सून पूर्व दमदार पाऊस होत आहे. त्यातच आता पुन्हा भारतीय हवामान खात्याने अहिल्यानगर जिल्ह्याला यलो अलर्ट दिला आहे. भारतीय हवाान खात्याच्या इशार्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात दि. २२ मे २०२५ रोजी काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस, गडगडाटासह वादळी वारा, वीज पडण्याची शक्यता आहे. तसेच दि. २३ मे २०२५ रोजी काही ठिकाणी गडगडाटासह वादळी वारा, वीज पडणे तसेच मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दि. २४ मे २०२५ व दि. २५ मे २०२५ रोजी वीजांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्य स्वरुपाचा पाऊस आणि तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली असून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी येलो अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अहिल्यानगर यांनी केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅयटर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/ सायकल यांचेपासून दूर रहावे.मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणा-या / लोंबणा-या केबल्स् पासून दूर रहावे. जाहिरात लक (होर्डिंग्ज्) कोसळून होणा-या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात लकांच्या (होर्डिंग्ज्) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जीनीशी कीतकी संपर्क असावा. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणा-या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणीपातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासुन तसेच ओढे व नाले यापासुन दुर रहावे व सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे, नदी अथवा ओढे-नाल्यांवरील पुलावरुन पाणी वाहत असल्यास पुल ओलांडू नये.

जुनाट/ मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणा-या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास करणे शययतो टाळावे.वादळी वारा व पाऊस युळे शेतीालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेताल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेताल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरिकांनी वादळी वारे, वीज व पाऊस यांपासून स्वत।चे व त्यांच्या जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सुचनांचे पालन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांचेशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१-२३२३८४४ वा २३५६९४० वर संपर्क साधावा

# जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी खा.जाधव पोहोचले तहसील कचेरीत

पूर्णा ।प्रतिनिधी

परभणीचे खासदार संजय ऊर्फ बंडू जाधव तालुक्यातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी थेट तहसील कचेरीत पोहोचले.त्यांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांची भेट घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करुन कामे मार्गी लावावीत असे आवाहन केले.

सर्वसामान्य नागरिकांची अनेक प्रशासकीय कामे काही अडचणींमुळे होत नाहीत. जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधीही त्यांच्या कामात लक्ष घालत नाहीत.जनतेच्या कामांसाठी सदैव तत्पर असलेले खासदार हे मात्र याला अपवाद ठरताना दिसत आहेत. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. खा.जाधव हे बुधवारी दि. २१ रोजी पूर्णा तालुक्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांना तालुक्यातील काही नागरिकांनी आपल्या प्रलंबित असलेल्या कामांसाठी भेटले. त्यांनी यावेळी कोणताही विलंब न करता जनतेच्या रखडलेली कामे मार्गी लावण्यासाठी थेट तहसील कार्यालय गाठले.यावेळी त्यांनी समृद्धी महामार्गात जमीन गेलेल्या




शेतकऱ्यांचे प्रश्न, घरकुल धारकांचा वाळू प्रश्न, निराधार योजनेतील लाभार्थ्यांचा प्रश्न, फेरफार, शेत,शिव पांदण रस्ते ,याबाबत प्रशासनाच्या अधीका-यांशी चर्चा करुन तातडीने समस्या सोडविण्यात याव्यात असे आवाहन प्रशासनाला केले.यावेळी काहीं नागरिकांची रखडलेली कामे देखील तातडीने मार्गी लागली आहेत.यावेळी तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर ,तहसीलदार माधवराव बोथिकर ,नायब तहसीलदार प्रशांत थारकर, नायब तहसीलदार कृष्णाजी मस्के आदी विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.तर खा.जाधव यांच्या समवेत उपजिल्हा प्रमुख दशरथ भोसले, शहरप्रमुख मुंजाभाऊ कदम, नगरसेवक श्याम कदम, प्रमोद ऊर्फ राजु एकलारे, बालाजी वैद्य,प्रा.गोविंद कदम ,बंडुअप्पा बनसोडे, विकास वैजवाडे, शंकर गलांडे, मनोज उबाळे, गजानन हिवरे, साहेबराव कल्याणकर, मुन्ना राठोड,रौफ कुरेशी,अमजद भाई,,राजु माने नागेश बर्दापुरे,आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# लक्ष्मीकांत शिंदे यांना राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार


पूर्णा ।प्रतिनिधी

युवा प्रतिष्ठाण अंबाजोगाईच्या वतीने दि.२४ में रोजी स्व. विलासरावजी देशमुख नगर परिषद सभागृह, अंबाजोगाई येथे कर्मवीर अॅड एकनाथराव आवाड यांच्या स्मृती दिनानिमित धम्म प्रचारक लक्ष्मीकांत एकनाथराव शिंदे यांना राज्यस्तरिय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्कार वितरंण सोहळ्याचे उदघाटक उपजिल्हाधिकारी दिपक बजाळे हे तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. विजय कुमठेकर (जालना) हे राहणार आहेत. यावेळी जे. एन. यु. चे प्रा.डॉ. मिलिंद आवाड, सत्यशोधक बहुजन आघाडीचे अध्यक्ष सचिन बगोड, प्रशांत दहिफळे, शितल लांडगे, संतोष नरसिंगे, मुख्य संयोजक अशोक पालके हे उपस्थित राहणार आहेत. लक्ष्मीकांत शिंदे यांना पुरस्काराबद्दल प्रकाश गायकावाड, मदिनाथ अंबोरे, रंगनाथ भालेराव, श्रीकांत हिवाळे, प्रकाश सरोदे, त्रिंबक भिसे, डॉ. पेनुकर, विकास कांबळे, तानाजी शिंदे, लक्ष्मण उफाडे सर, विनोद गायकवाड, जिल्हाध्याक्ष अ. साठे. क्र. फोर्ज, अविनाश मोरे, पष्णु



शेळके, मानवि हक्क अभियान जिल्हा अध्यक्ष, राजु कर्डिले पत्रकार विजय खंडागळे, बालाजी कांबळे. पांडुरंग शिंदे, इत्यादीने अभिनंदन केले आहे.



मुंबई - मंत्रालयीन दालनात ना श्री शिवेंद्रसिंहराजे भोसले साहेब,लातूर जिल्हयाचे पालकमंत्री तथा मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांना लातूरची शिक्षण क्षेत्रातील भरारी पहाता लातूरला स्वतंत्र विद्यापिठासाठी पुढाकार घेण्याची निवेदनाद्वारे आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने मागणी करण्यात आली.यावेळी कृती समितीचे मुख्यसंयोजक अँड प्रदिपसिंह गंगणे, सुरेश थोरात, अँड सुहास थोरात आदी उपस्थित होते.

# मुंबई-कल्याण जुगार मटका अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## अंबड पोलिसांकडून एकूण ६४ हजारांचा मुद्देमाल जप्त तर १६ मटका चालकांवर ४ गुन्हे दाखल

अंबड / शेख फारुक

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत चालू असलेल्या मुंबई-कल्याण नावाचा मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापेमारी करून कारवाई केली आहे.या प्रकरणी १६ मटका चालकांवर ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबत प्रभारी पोलीस अधिकारी अमोल गुरले यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत शहरात विविध ठिकाणी मुंबई-कल्याण नावाचा मटका जुगार चालू असल्याची माहिती मिळाल्याने सदरबाबतची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल कृष्णा खांबे यांना देऊन प्रभारी पोलीस अधिकारी अमोल गुरले यांनी पोहेकॉ.फलटणकर,पोशि.भिसे,पो.शि.मुंढे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अंबड येथील पोहेकॉ.गायके,पोना.जाधव,पोना.घोडके,पोशि.राऊत,पोशि.देशमाने,अशी टिम बनवून संयुक्तीकपणे शहरातील सरकारी दवाखाना रोड, महाराष्ट्र द्वार,नाथ्रेकर चौक,देशी रोड याठिकाणी मटका जुगार खेळत व खेळवित असलेले मटक्याच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून मटका जुगार चालकांना ताब्यात घेऊन त्याच्याकडून मटक्याचे साहित्यासह एकूण ६४,५३०/ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.अंबड पोलीस ठाणे येथे या मटका चालकांवर कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वयेनुसार विविध ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल,अपर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड श्री विशाल कृष्णा खांबे,




यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंबड प्रभारी पोलीस अधिकारी अमोल गुरले,पोहेकॉ.फलटणकर,पोशि.भिसे,पोशि.मुंढे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अंबड येथील पोहेकॉ.गायके,पोना.जाधव, पोना.घोडके,पोशि.राऊत,पोशि.देशमाने, यांनी केली आहे.

# शंभर रुपयाच्या मुद्रांक बॉड विषयी शेतकऱ्यांचे हाल - खरात

अबंड ।प्रतिनिधी

तालुक्यातील अबंड तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शंभर रुपयाच्या मुद्रांक बॉड मिळत नसल्याने छोटा मोठा कामासाठी पाचशे रुपयाचा मुद्रांक बॉड घ्यावा लागत असल्याने आर्थिक मृदंड सोसावा लागतो या कारणाने माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब हरीभाऊ खरात यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी जालना यांना मुद्रांक विक्री बाबत लेखी तक्रार करून शेतकऱ्यांची व्यथा मांडली आहे.

निवेदन देत म्हटले आहे की,अंबड तालुक्यात १०० रुपये किंमतीचा मुद्रांक विक्रेते यांनी मागणी केलेली असून मुद्रांक विक्रेते देण्यास टाळाटाळ करत असुन सदर मुद्रांक विक्रेते हे शासनाच्या धोरणानुसार मुद्रांक किंमत ५०० रुपये पेक्षा कमी मुद्रांक देता येत नाही. असे सांगत आहेत परंतु प्रत्यक्षात शासन नियमानुसार मुद्रांक किंमत १०० रुपये किंमतीचे मुद्रांक विकु नये असे कोठे



हि परिपत्रकामध्ये आढळत नाही. काही कामांकरिता ५०० रुपये किंमतीचे मुद्रांक शुल्क वापरण्यात यावे असे नमुद करण्यात आले आहे.तरी या मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी सर्व मुद्रांक विक्रेते यांना आदेशीत करुन १०० किंमतीचे मुद्रांक विक्री करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब हरिभाऊ खरात यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केलेली आहे.

# किल्ले धारूर येथे रस्ता मोकळा करण्याच्या कारवाईला उग्र विरोध करणाऱ्या ६ जणांविरुद्ध शासकीय कामात अडथळा केल्या प्रकरणी गुन्हे दाखल

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तहसील कार्यालयाच्या आदेशानुसार महसूल विभागाने शेतकऱ्यांसाठी असलेल्या रस्त्यावरचे अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करून घेत असताना स्थानिक अतिक्रमण धारकांकडून उग्र विरोध झाल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये महसूल पथकावर आक्षेपार्ह वर्तन करत सरकारी कामात अडथळा आणण्यात आला. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात सहा आरोपींविरोधात विविध गंभीर गुन्ह्यांखाली एफआयआर नोंदविण्यात आली आहे.

धारूर येथील सर्वे नंबर ६२८ या जमिनीत जुना रस्ता असून काही शेतकरी व नागरिकांनी हा रस्ता अडविलेला आहे. यासंदर्भात रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांनी रीतसर अर्ज दिलेले होते त्यावर रस्ता मोकळा करण्याविषयी तहसीलदार धारुर यांनी आदेश पारित केलेले आहे, महसूल विभागाने पूर्वीच आदेश व नोटीस बजावल्या होत्या. विशेष म्हणजे दि. २१ फेब्रुवारी २०२२ रोजी तहसीलदार कार्यालय धारूर यांनी अतिक्रमण हटवण्याचा स्पष्ट आदेश काढला होता. त्यानंतर दि. २८ एप्रिल २०२५ रोजी पुढील अधिसूचना काढून संबंधितांना वेळेत अतिक्रमण हटवण्याची सूचना दिली होती. मात्र, आदेशाकडे दुर्लक्ष करत त्यांनी अतिक्रमण तसेच ठेवले व शेतकऱ्यांचे रस्त्याची अडवणूक सुरूच ठेवली .

दि. २० मे रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान तहसीलदारांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी कपिलकुमार गोडसे, ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण मुळे, आणि धारूर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक व इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह जेसीबीच्या साहाय्याने रस्ता मोकळा करण्याची कारवाई सुरू करण्यात आली. रस्ता मोकळा करण्यासाठी मोजणीचे खुणांकन सुरू होते.कारवाई सुरू होताच उत्तम मुंजाबा शिंदे, तय्यब अब्दुल शेख, अस्लम तय्यब शेख, नवनाथ मुंजाबा शिंदे, रंजना श्रीराम मुंडे आणि उत्तम शिंदे यांची पत्नी (नाव अज्ञात) यांनी उग्र विरोध सुरू केला व काहीजण जेसीबी समोर येऊन उभे राहिले त्यांनी कारवाईला विरोध करत सांगितले की, हे प्रकरण कोर्टात सुरू आहे. अधिकारी व पोलिसांनी त्यांच्याकडे कोणतीही स्थगनाची आदेशपत्रे किंवा वरिष्ठांचे स्टे ऑर्डर किंवा न्यायालयीन निर्णय आहेत का, याची विचारणा केली असता त्यांनी कोणतेही पुरावे सादर केले नाहीत.




या गोंधळात आरोपींनी सरकारी कामात अडथळा निर्माण करत ग्रामविकास अधिकारी मुळे यांच्याकडील मोजणी टेप जबरदस्तीने हिसकावून घेतला, तसेच त्यांना धक्काबुक्की केली. आरोपी नवनाथ शिंदे याने उत्तम शिंदेला फोन करून जेसीबी हलवू देऊ नका, काय व्हायचं ते होऊ द्या असे सांगितल्याची माहितीही समोर आली आहे.फिर्यादी मंडळ अधिकारी कपिलकुमार गोडसे यांच्या तक्रारीवरून धारूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ०१८३ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (२०२३) चे कलम ११५(२) , १२६ (सरकारी कामात अडथळा), १३२ , १८९(२), १९०, आणि १९१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवाजी रानाबा सरजे यांच्या कडे सोपवण्यात आला आहे.

सरकारच्या आदेशानुसार रस्ता मोकळा करण्यासाठी अधिकारी प्रयत्नशील होते. मात्र, स्थानिकांनी उग्र विरोध करून प्रशासनाच्या कायदेशीर कामकाजात अडथळा निर्माण केला, हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. यामुळे महसूल विभागाचे अधिकाऱ्यांना दिलेला पोलीस संरक्षण असूनही कारवाई अर्धवट सोडावी लागली. एकीकडे शासन शेतकऱ्यांना रस्ता देण्याविषयी अत्यंत सकारात्मक असून त्याविषयी अनेक मोहिमे राबविली जात आहे परंतु आजही अनेक शेतकरी रस्त्यापासून वंचित आहोत व काही आडमुठ लोकांचे हटधरमी मुळे अनेक शेतकरी त्रस्त आहेत.

या घटनेने शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या प्रवृत्ती विरोधात कठोर पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली आहे. स्थानिक प्रशासनाने अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार , राज्याचे महसूल मंत्री ना.बावनकुळे साहेब तसेच जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणात लक्ष घालून रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने होत आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा करण्याविषयी प्रकरणांवर प्रशासन कशी कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा..

या घटनेने शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या प्रवृत्ती विरोधात कठोर पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली आहे. स्थानिक प्रशासनाने अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार , राज्याचे महसूल मंत्री ना.बावनकुळे साहेब तसेच जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणात लक्ष घालून रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने होत आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा करण्याविषयी प्रकरणांवर प्रशासन कशी कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## राजमाता– राष्ट्रमाता जिजाऊ प्रबोधन मंडळ बीड व ज्येष्ठ नागरिक संघ मित्रनगर बीड यांच्या वतीने

# सौ. शितल चाटे – सानप यांचा सत्कार संपन्न

बीड ।प्रतिनिधी

राजमाता–राष्ट्रमाता जिजाऊ प्रबोधन मंडळ बीड व ज्येष्ठ नागरिक संघ, मित्रनगर बीड यांच्या वतीने सौ. शितल चाटे–सानप, यांचा कर्तव्यदक्ष व प्रामाणिक मंडळ अधिकारी म्हणून, श्री हरिचंद्र चव्हाण (दादा) सेवा निवृत्त डेप्युटरी राजनियर मधुकर मुस्के, रमेश बुरंगे, यांच्या हस्ते शाल, बुके व श्री सन्मानचिन्ह देउन सत्कार करण्यात आला.

प्रारंभी दादासाहेब सादोळकर यांनी सत्कार करण्यापाठीमागची भूमिका विशद केली. सौ शितल चाटे–सानप यांनी सत्काराला उत्तर देतांना आपल्या वडीलानी अभ्यासाची गोडी कशी लावली, व त्यामुळे प्रथमता तलाठीपदी अमरावती येथे कशी सेवा केली हे सांगून,आपण अवैध धंदे, बाळू उपसा यास कसा पायबंद घातला. तसेच शेतकरी हा केंद्र बिंदू मानून, प्रभोलनाला बळी न पडता त्यांची कामे, कशी केली, व त्याचेच फळ म्हणून, मुंबई, पुणे, संभाजीनगर, बीड, दिल्ली, गुजराथ आदि निकाणी सत्कार संपन्न 'झाल्याचे सांगितले, आपण महिला असूनही आज ३४ गावचा कार्यभार सांभाळतो व श्वास असे पर्यंत शेतकरी व अन्य कोणत्याही व्यक्तीची प्रामाणिक काम करु असा आत्मविश्वास प्रतिपादन केला.. तसेच शेळके साहेबासारखे वरिष्ठ अधिकारी लाभल्यामुळे आम्हाला अधिकचे काम करण्यास बळ मिळते असे आवर्जून सांगितले. या सत्कार सोहळा कार्यक्रमास निवृत तहसीलदार कांतीलाल सानप, राजेंद्र कुलकर्णी, वी आर कराडे, दीपक जोशी, बी एम. बांगर, ए–के–वाघ धोंडीबा सावंत, फुलचंद ढाकणे, शेळके, शितलच्या आई इंदूमती व वडील लक्ष्मण चाटे आदी उपस्थित होते.

# मुख्याधिकारी साहेबा,बीड शहरातील समस्यांवर तातडीने उपाययोजना करा – डॉ. योगेश क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे.





निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले.

पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली.

बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी प विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला. शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

# एका स्त्रीच्या मनाची व्यथा

प्रत्येकाच्या जीवनामध्ये कधी काय होईल याच गणित मांडता येत नाही. सुख दुःखाचा किनारा असलेल्या या जीवनरुपी समुद्रात प्रत्येक लाटागनिक विविध नारंगी अनुभवांचे मोती जपत त्यात ऊठणाऱ्या वादळांना सामोरे जावे लागते .त्यात हवी असते सात प्रत्येक वेळी आपल्या माणसाची त्याच्या प्रेरणेची, विश्वासाची आणि प्रेमाची जीवनामध्ये संघर्ष करण्यासाठी मनाचा पक्का निर्धार हवा असतो. त्यात सतत आत्मविश्वासाचा दिवा तेवत ठेवावा लागतो. जीवन कधी कोणते रूप दाखवेल हे देव जाणे.

कधी मुसळधार बरस्त पाणी ....
कधी गुलाबी थंडी ....
कधी मधुर मस्त गारवा ....
कधी रणरणतं उन..... तर ...
कधी काळी टपोरी चांदणी रात्र.......!

आपल्या गुणवैशिष्ट्यांनी निसर्ग प्रत्येक गोष्टीला कसे तोंड द्यायचे याचे आदर्श प्रस्थापित करतो. प्रत्येकाचे जीवन कधी कसे वळण घेईल हा नियतीचा भाग आहे. एखाद्या काळ्या रात्री कडकडून वीज चमकावी ना तसा एक विचार मनात येऊन जातो. ... भावनांचा निशब्द ओलावा जनु वेदनेचा अबोल हुंकार हे आयुष्य म्हणजे काय फक्त नियतीचा जुगारच ..... सायंकाळ होऊ लागली तशी तिच्या मनात विचारांची गर्दी होऊ लागली आठवणींचे पक्षी गीरड्या घालू लागले .....किती भरभर गेले ते दिवस कधी आयुष्याची संध्याकाळ झाली ते कळलेही नाही ते हसरे दिवस ती शाळा मैत्रिणी, गमती, जमती कितीतरी मधुर आठवणी आयुष्यातून का निघून जावेत हाताच्या मुठीतून वाळूचे कण निसट्चून जावे तसे.....च... का.....? तिने एक हुंकार दिला पुढे लग्न झाले अल्पवयातच तिला हे सुद्धा माहीत नव्हते की लग्न म्हणजे काय ? कारण तिला अभ्यास करायचा होता तिला तिचं करियर घडवायचं होतं परंतु किशोरवयांमध्ये असल्यामुळे अगदी पंधरा वयोगटांमध्येच तिच्या घरच्यांनी लग्नाचा विचार केला गेला. सुखदुःखाचा हा दोघांचा संसार जसा दोघांनी झोपायला हवा तसा लग्नाचा अर्थ कळायला हवा याचे उत्तर तिला सापडले पण खूप उशीर झालेला होता.

लग्नाची खरी गरज असते ती वार्धक्यातच कारण तिथे असतो निर्मळ सहवास शुद्ध प्रेम व एकमेकास आधाराची गरज...

समजून घालणार कोणी असेल तर रुसण्याला अर्थ असतो.

पाहणार कोणी असेल तर दिसण्याला अर्थ असतो तर साथ देणार कोणी असेल तर साद घालण्याला अर्थ असतो आणि आपलं कुणी असेल तर जगण्याला अर्थ असतो.

हे तिला समजलं पण लग्नानंतर तब्बल तेरा वर्षानंतर

पण दुःखाचा पाऊस झेलताना बराच काळ सरला आहे आणि माझ्या मनाचा डोह काटोकाठ भरला आहे चांगलं जगण्यासाठी सोसावा लागतो अन्याय, अत्याचार, खोटं बोलणं, चूक नसताना सहन करणे.

म्हणूनच म्हणते मला चांगलं जगताच आलं नाही आज जे काय आहे त्यात मी समाधानी आहे, पण कुठेतरी मनाच्या तळाशी सहल आहे बोच ही आहे असमाधानची जाणवणारी तीव्र कळ आहे. खूप काहीतरी हातातून निसटून चालल्याचं शल्य आहे. पण हे सारे शब्दा त मला मात्र व्यक्त करता येत नाही. असं का होत आहे कुणास ठाऊक?

वाटतं हे सगळं सोडावं आणि दूर कुठेतरी अपरिचित ठिकाणी एकदम अनोळखी लोकांच्या देशात जाऊन आणि तिथेच स्वतःच फक्त स्वतःसाठी असणार जग निर्माण कराव मनाला येईल तसं जगाव बेगडी नात्यापासून जपावं स्वतःला आत्ता स्वप्नही अशीच पडत आहेत. पण मनामध्ये विचारही हेच पण काय करू काही मार्ग सापडत नाही. मनाचा ठाम निर्णय पण होत नाही. वाटतं हा सारा मूर्खपणा आहे. येणारी जबाबदारी टाळण्यासाठी दुबळ्यामनाने खेळलेली चाल आहे द्वंद सुरू आहे.

आणि डोकं ही गरगरून जात आहे आधार मात्र कुठेच दिसत नाही.

काय कराव सुचत नाही मी जे काही अनुभवते शब्दात व्यक्त करण्याची माझ्याजवळ ताकत ही नाही तरी मनामध्ये एक अनामिक ओढ असल्यासारखं वाटतं पण हा माझा संसार त्यातली माझी माणसे हे एवढा एका क्षणात सोडून झालं योग्य आहे का मी अंगावर ओढून घेतलेली जबाबदारी यामुळे सर्वजण अशाने पाहतात .

सर्वांच्या अपेक्षा आकांक्षा वाढत आहेत माझ्याकडून पण माझं काय आणि माझ्या प्रेमाचं काय? माझ्या चुकीमुळे फुललेल्या फुलाचं काय?... काय करू प्रचंड डोकं जड होत आहे. काहीच सुचत नाहीये

उद्या आपण हे सर्व सोडून गेल्यावर चित्र कसे असेल क्षणात उध्वस्त झाल्यासारखं भक्का स लेलं साऱ्यांना दुःखात लोटून जाते असं वाटतं पण मग पुढे काय याचाही सगळं अंधार कस




एक दोन वेळेला शीळ पाक खातो ते पण भेटल की नाही. डोक्यावर छत आहे हे पण नंतर असेल की नसेल उजेड सोडून सरळ आपण अंधाराकडे झेपावण्यासारखं वाटतं मन घायाळ होत आहे. मनाची अस्वस्थता पडणाऱ्या अंधाराबरोबर वाढत जात आहे.

या सर्व गोष्टींची जाणीव मला आहे पण असं नेहमी वाटतं की

मला कोणी समजू शकत नाही का ? या सर्व लोकांच्या दुनियेमध्ये मी एकटीच आहे का? माझा आवाज कोणा पर्यंत का नाही पोहोचू शकत ? कोणावर मला इतका विश्वास का नाही वाटत ज्याला मी माझं सगळं दुःख सांगावं ? फोन करावा म्हटलं तर असा एकही नंबर नाही जो माझी अस्वस्थता दूर करेल. खोटे हसणारे स्तुती करून मनाला दुखवणारे अनेक आहेत. माझ्या आयुष्यात असं काय झालं आणि का ? कशासाठी करते मी हा सगळा संघर्ष ? का सहन करते मी या सर्वांना ? का माझ्यावर एवढा अत्याचार होतोय ? का मला यांनी चार चौकटीमध्येच ठेवलेलआहे? का कुणाशी मला बोलू देत नाही ? का कुणासमोर मला येऊ देत नाही? रात्र रात्र मी अशीच जागून काढते झोप पण येत नाही.

आज मावळतीचे रंग का माझं मन मोहून घेत नाही घरातून दिसणारी सुंदर संध्याकाळ आकाशात दिसणारी ती रंगबेरंगी ढगे का माझ्या मनाला शांती देत नाहीत मला सर्व गोष्टींचा का राग येतोय ?

का तिरस्कार येतोय? का मला जगावं असं नाही वाटत?

आपण एखादी गोष्ट विसरण्यासाठी कुठेतरी स्वतःला गुंतून घेतो पण मनात एखादी घटना बसलेली कितीही विसरायचा प्रयत्न केला तरी नाही विसरू शकत. मला सारखं वाटतं की माझं नशीब मला मुद्दाम चिडवतय.

ओळख दोनच गोष्टी करते ओळख दाखवते तरी नाहीतर टाळते तरी पण जर ओळखच पटत नसेल तर.

आज या क्षणाला मला माझी ओळख पटत नाही आहे रात्रीच्या अंधारात मला माझ अस्तित्वच दिसेनासे झालय..

असं का होते कोणी सांगू शकेल का मनाच्या उदास पणाला काही कारण नाही पण मी आनंदी तर बिलकुल नाही. कारण योगायोग चमत्कार , नशीब यावर सध्या मी विसरलेली आहे. नशीब मला सगळं देते पण ते मला मिळत आहे का याची जाणीवच होत नाही कारण मी फक्त माझ्या आयुष्यात एकाच ठिकाणी अडकून पडलेली आहे. तिथे मला रस्ताच दिसत नाही. आणि जी माझ्यासोबत राहत आहे ते माणसं नाहीच आहेत असं माझ्या आई–वडिलांनी का केल असेल मला कळतच नाही. पण त्यांना सांगावं एवढी माझी हिम्मत नाही कारण त्यांच्या चेहऱ्यावर मी दुःख नाही बघू शकत.

माझं मूल दिल्या घरी सुखी आहे असं म्हटलं की त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद गगनास मिळण्यासारखा आहे. आणि हा आनंद मी नाही हीरावून घेऊ शकत हा अधिकार मला नाही.

इंद्रधनुष्याच्या सात रंगाप्रमाणे आयुष्यात अनेक रंग येतात फक्त आपल्याला त्या प्रत्येक रंगाचा उपभोग घेता आला पाहिजे. प्रत्येक क्षण जगल्यावर प्रत्येक गोष्ट रंगाच्या आस्वाद घेतल्यावर केल्यावर माणसाला ती चांगली आहे की वाईट आहे हे म्हणण्याचा अधिकार आहे पण नशिबामुळे हरला म्हणणारा माणूस जास्त धोकादायक असतो स्वतःचा दुबळेपणा तो नशिबाचे पांघरून घालू नको आपण मूळचे तसे नाही ते केवळ नशीब होतं म्हणून माझं असं झालंय म्हणतो.

तेव्हा किती सुखी होते मी जेव्हा जीवनात कोऱ्या कागदाप्रमाणे होते नंतर माझ्या जीवनात तू आलास क्षणभर हसवलं.

क्षणभर लाजवलं

मग एकदम जन्मभर रड वत ठेवलंस वाटलं नव्हतं तुझ्यावर प्रेम केल्यावर इतकं दुःख, वेदना, तुम्हा सर्वांचा अत्याचार मला सोसावा लागेल, आज पर्यंत श्वासांनी मला पण यापुढे त्यांना पोसावे लागेल ....

माझ्या चेहऱ्यावरचे भाव का तुला कधी कळलेच नाहीत. का माझ्या मनात दुःख त आहेत ते तुझ्या मनाला कधी जाणवलीच नाहीत मी तुझ्यासाठी तुझ्या परिवारासाठी काय नाही केलं पण तरीही माझं मन तुला कधी च कळल नाही. तुझ्यासाठी ते मन तळमळतय पण तू कुठे विचार केलास कधी कोणीतरी आपल्यावर एवढं जिवापाड प्रेम करतय , आपल्याला जपतय ....

लेखिका
**मनीषा बिक्कड (घुले)**